
ISSN: 2393-8900 Impact Factor : 2.7825(UIF) Volume - 9 | Issue - 8 | APRIL - 2023

Historicity researcH Journal

# वसंतराव नाईक यांचे कृषीक्षेत्रातील कार्यविषयक प्रासंगिका



**प्रा.संजय किशन राठोड**
**(संशोधक विद्यार्थी)**

**ABSTRACT:**
वसंतराव नाईक यांनी आपल्या जीवन काळामध्ये महाराष्ट्राच्या आर्थिक, सामाजिक, कृषी विषयक व राजकीय विकासासाठी खूप मोठे योगदान दिलेले आहे.वसंतराव नाईक यांच्या व्यक्तिमत्त्वाला लहानपणापासूनच मिळालेल्या चांगल्या संस्कारामुळे त्यांची जडणखडण ही एक सामाजिक कार्यकर्ता या क्षेत्रातूनच निर्माण झाली.महाराष्ट्रातील “यवतमाळ” जिल्ह्यातील “पुसद” तालुक्यात असलेले “गहु ली” या छोट्याशा खेडेगावात शेतकरी कुटुंबात वसंतराव नाईक यांचा जन्म वडील “फुलसिंग नाईक” तर आई “हु णकाबाई” यांच्या पोटी १ जुलै १९१३ रोजी झाला. त्यामुळे १९८९ पासून १ जुलै हा दिवस महाराष्ट्रात“कृषी दिन” म्हणून साजरा केला जातो.वसंतराव नाईक यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीची सुरुवात पुसद नगरपालिकेचे “नगराध्यक्ष” म्हणून केली व पुढे त्यांनी महाराष्ट्र राज्याचे सर्वात दीर्घकाळ “मुख्यमंत्री” राहण्याचा मान सुद्धा पत्करला. महाराष्ट्रातील मातीच्या कणाकणात समृद्धी फुलविण्याचा कृषीवर आधारित महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला वृद्धिगत करण्याचा मानस, शेतीवर असलेला समाज सुधारण्यासाठी वसंतराव नाईक यांनी हरितक्रांतीचा कार्यक्रम जिद्दीने पुढे रेटला व दोन वर्षात महाराष्ट्राला अन्नधान्यात स्वयंपूर्ण केले . भारताचे राष्ट्रपती , भारतरत्न डॉ. प्रणव मुखर्जी यांनी "वसंतराव नाईक हे भारत मातेचे थोर सुपूत्र आहे." या शब्दात नाईकांचे गौरव केले आहे. तसेच 'थेट शेतकऱ्यांच्या बांधावर' मोहिमेचे प्रवर्तक, विचारवंत एकनाथराव पवार यांनी "आधुनिक कृषीप्रधान भारताचे कृषीसंत" या शब्दात वसंतराव नाईक यांचे वर्णन केले आहे. वसंतराव नाईक यांचे “कृषि क्षेत्रातील योगदान” जाणून घेण्यासाठी हा विषय प्रस्तुत शोधनिबंधासाठी निवडला आहे.

प्रस्तुत शोधनिबंध हा प्रामुख्याने “दुय्यमसामुग्रीवर” आधारित आहे.

महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्रात, सामाजिक क्षेत्रात तसेच राजकीय क्षेत्रात वसंतराव नाईक यांचे योगदान अत्यंत मोलाचे ठरले आहे महाराष्ट्राची शेती, उद्योग, सहकार, इत्यादी क्षेत्रात त्यांनी मौलिक कार्य केले आहेत. या कार्यातून त्यांचे महाराष्ट्राच्या विकासातील सामाजिक, आर्थिक व राजकीय योगदान दिसून येते.

## उद्दिष्टे:-

1. वसंतराव नाईक यांच्या नेतृत्वगुणांच्या विविध पैलूंचा अभ्यास करणे .

2. वसंतराव नाईक मुख्यमंत्री असताना घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णय यांचे व कार्यांचा आढावा घेणे.
3. हरितक्रांतीचे प्रणेते म्हणून वसंतराव नाईक यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करणे.
4. वसंतराव नाईक यांचे कृषी क्षेत्रातील असलेल्या योगदानाचा अभ्यास करणे.
5. वसंतराव नाईक यांचे प्रेरणादायी राजकीय कार्यकिर्द व कृषी विषयक योगदान जनसामान्यासमोर मांडणे..

## कृषी क्षेत्रातील योगदान व विकास:-

भारत हा एक कृषिप्रधान देश आहे. या देशातील ८० टक्के लोकसंख्या ही कृषी क्षेत्राशी निगडित आहे. तसेच महाराष्ट्र राज्य कृषी क्षेत्रात अग्रेसर आहे, परंतु महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्रामध्ये जेव्हा जेंव्हा कृषीविषयक अडचणी निर्माण होतात तेव्हा आपल्या डोळ्यासमोर एक नाव येते ते म्हणजेच महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक. वसंतराव नाईक यांनी माणूस व माणुसकी हे केंद्रबिंदू ठेवूनच राजकारण केले परंतु ते फक्त राजकारणी नव्हते तर समर्थ शासक, प्रेमळ मित्र, मार्गदर्शक, दिलदार मनाचे सौजन्यशील सुसंस्कृत स्वभावाचे तळमळीचे समाजसेवक होते आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे ते हाडाची शेतकरी होते. शेती क्षेत्रातील त्यांची भूमिका ही एक आदर्श भूमिका होती. म्हणूनच त्यांना "हरितक्रांतीचे प्रणेते" असे म्हटले जाते. पिढ्यानपिढ्या पारंपारिक पद्धतीने चालत असलेल्या शेती व्यवसायाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन त्यांनी शेतकऱ्यांना एक कृषी संजीवनीच मिळवून दिली.

११ एप्रिल १९५७ रोजी यशवंतराव चव्हाण साहेबांनी आपल्या मंत्रिमंडळात वसंतराव नाईक यांची "कृषीमंत्री" म्हणून निवड केली. कृषीमंत्र्याची सूत्रे हातात घेतल्यानंतर वसंतरावजींनी राज्यात अनेक ठिकाणी दौरे काढले व शेतकऱ्यांमध्ये शेतीबद्दल जागरूकता निर्माण केली. आपला देश शेतीप्रधान आहे. शेतकरी हा आपल्या देशाचा कणा आहे. आज ८० टक्के लोक खेड्यात राहतात त्यांनी शेतकऱ्यांना त्यांच्या जबाबदारीची व कर्तव्याची जाणीव करून दिली. ते नेहमी म्हणायचे,"जिथे जे पिकू शकते ते पिकवण्याचा प्रयत्न केला पाहिजे, अधिक धान्य पिकवा" ही त्यांची पंडित नेहरूंच्या काळापासून एक घोषणा होती. परंतु देशातील धान्याचे उत्पादन वाढत नव्हते. "शेतीचा खरा विकास नुसते जमीन सुधारण्याचे कायदे करून होणार नाही,तर त्यासाठी शेतीच्या मूलभूत प्रश्नांना हात घातला पाहिजे". असे त्यांना वाटायचे . त्यांनी आपल्या काळात शेतीसाठी असणाऱ्या अनेक मूलगामी योजना सुरू केल्या व महाराष्ट्रात शेतीला आधुनिकतेची जोड देऊन चालण्या देण्याचा प्रयत्न केला.

"आपल्या देशातील दारिद्र्य आणि अन्नधान्याची टंचाई याविरुद्ध लढा देण्याची गुरुकिल्ली शेती आहे, ज्या देशाला शांतपणे जगायचे आहे आणि स्वाभिमानाने कोणत्याही गटात सामील न होण्याचे धोरण अवलंबायचे आहे तर त्यांनी आपल्या भूमीवरच देशातील जनतेस लागणारे अन्न टिकवावे लागणार आहे" असे ते म्हणायचे.

१९६५-६६ च्या सुमारास आपल्या देशावर अनेक संकटे आली. संपूर्ण देशात अन्नधान्य कमी पडत होते. पाकिस्तानने भारतावर आक्रमण केले होते. अशा बिकट परिस्थितीत भारत देश भयाकुल झालेला असताना एखाद्या धैर्यवान नेत्याची जी भूमिका असायला पाहिजे तीच भूमिका नाईक साहेबांनी बजावली. शेतकऱ्यांच्या या मुलाने शेतकऱ्यांची दुःख जवळून पाहिलेली होती आणि "शेतकरी सुखी तर देश सुखी" हा देशाच्या प्रगतीचा मूलमंत्र त्यांना अवगत होता. त्यामुळे देशाला अन्नधान्याच्या बाबत समृद्ध करण्यासाठी काय केले पाहिजे हे शोधून काढण्याचा त्यांनी ध्यास घेतला आणि त्याचे उत्तरही शोधून काढले. वसंतराव नाईक म्हणतात,"शेतीत

राबण्यासारखे दुसरे सुख नाही आणि पेरलेले शेत पिकाने भरले की पाहायला त्यापेक्षा जगात दुसरे सौंदर्य कोणतेही नाही". यावरून वसंतराव नाईकांना शेती व शेताबद्दलची असणारी आपुलकी व अतोनात प्रेम हे आपल्याला दिसून येते .

भारताला आपली जनता जगवण्यासाठी अमेरिकेतून गहू आयात करावा लागायचा. परंतु, काही काळाने अमेरिका सुद्धा भारतावर जाचक अटी लागू लागला व भारताला गहू देणे थांबवला आणि सांगितले की,"जर तुम्हाला आमचा गहू पाहिजे असेल तर, काश्मीरचा प्रश्न आम्ही म्हणू तसा सुटला पाहिजे" तेव्हा त्यावेळेसचे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री चौताळून उठले आणि त्यांनी अन्नधान्याच्या प्रश्नाबाबत,"आपला देश स्वयंपूर्ण झाला पाहिजे" असे सांगितले. अशा परिस्थितीत महाराष्ट्राचा मुख्यमंत्री स्वस्त बसणे शक्यच नव्हते. जेव्हा देशाचा स्वाभिमान अमेरिका गहाण मागत आहे हे दिसतात नाईक साहेब पेटून उठले आणि त्यांनी महाराष्ट्राला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण करण्याचा विडाच उचलला .१९६५ ला वसंतराव नाईक यांनी पुण्यातील शनिवार वाड्यासमोर आपल्या जाहीर भाषणात एक घोषणा केली की,"येत्या दोन वर्षात महाराष्ट्र अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण केला नाही तर मला जाहीररीत्या फाशी द्या" असे सांगितले. परंतु असे सांगून ते स्वस्त बसले नाही तर ते दोन वर्षात सिद्धही करून दाखविले आणि महाराष्ट्र अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनवला.

शेतीचा धंदा पवित्र असून शेतकरी प्रत्यक्ष परमेश्वरच आहे. त्याची प्रतिष्ठा वाढविण्यातच राष्ट्राची प्रतिष्ठा वाढणार आहे. हा मोठा विचार वसंतराव नाईक यांनी देशाला दिलेला आहे. यावरून आपल्याला वसंतराव नाईकांच्या मनात शेतकऱ्यांविषयी किती आदर होता हे कळून येते. "शेतकरी हा देशाचा आधारस्तंभ आहे असे सर्वजण मानतात पण तो समस्यांनी पंगू झालेला आहे याची खंत कुणालाच वाटत नाही" ही खंत वसंतराव नाईकांना वाटली. आज महाराष्ट्र शासनाने आर्थिक परिस्थिती चांगली असूनही महाराष्ट्रात हजारो शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहे, याकडे शासन कानाडोळा करण्याचा प्रयत्न करते, पण यामागे कोणती कारणे आहेत हे शोधण्याचा प्रयत्नही करीत नाही. १९७० पर्यंत कापसाच्या बाबतीत दलालामार्फत शेतकऱ्यांची लूट व्हायची, त्यांना योग्य तो भाव मिळायचा नाही, त्यामुळे वसंतराव नाईकांनी याकडे लक्ष दिले व शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक थांबविली आणि १९७१ सालामध्ये "कापूस एकाधिकार खरेदी योजना" लागू केली. जी आजही शेतकऱ्यांना हमीभाव जाहीर करत असते. वसंतराव नाईक मुख्यमंत्री असताना महाराष्ट्रातील दूध विषयक समस्या सोडवण्याच्या दृष्टीने गंभीरपणे विचार केला गेला. संकरित गाईच्या दुधाने महाराष्ट्रातील व देशातील दुधाचा प्रश्न सोडवता येईल ही दूरदृष्टी वसंतराव नाईकांना होती.

१९७२- ७३ मध्ये महाराष्ट्राला भयानक अशा दुष्काळी परिस्थितीतून जावे लागले. दुष्काळाने सर्व जनता ग्रासली होती. शेतकऱ्यांना अन्नासाठी वनवन फिरावे लागत होते. यातून मार्ग काढत वसंतराव नाईक यांनी "रोजगार हमी योजना" चालू करण्याचा निर्णय घेतला. "समाजातील मागासलेल्या वर्गाचा जर विकास करायचा असेल तर त्यांना रोजगार पुरवून त्यांचे दारिद्र्य कमी केले पाहिजे, सर्वात जास्त मागास स्थितीत असलेल्या रोजगार पुरविणे आपल्या व्यापक विकास योजनेचा आवश्यक भाग असला पाहिजे" असा मूलभूत विचार वसंतराव नाईक यांनी मांडला.

कृषीक्रांतीची व्याख्या करत वसंतराव नाईकांनी असे म्हटले की,"शेतात खत, गावात पोत आणि घरात एक मत ही तीन सूत्रे प्रत्यक्षात आणणे म्हणजे 'कृषीक्रांती' होय". नाईक साहेब नेहमी बोलत की,"नदीवरून पाणी आणा, विहिरीचे पाणी घ्या, ओंजळीने पाणी आणा, नाहीच काही जमले तर घामाने जमीन भिजवा, पण

शेती ओलीत करा" या उद्गारावरून असे लक्षात येते की, त्यांनी त्यावेळी घेतलेल्या निर्णयामुळेच महाराष्ट्रात "कृषीक्रांती" झाली व त्या क्रांतीचे ते "जनक" झाले.

## सहकार क्षेत्रातील योगदान:

वसंतराव नाईक हे महाराष्ट्राचे पहिले सहकार मंत्री होते. त्यामुळे सहकाराचे महत्त्व त्यांनी चांगले माहीत होते. "देशात समाजवादी समाज व्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी सहकार हा एक मार्ग आहे. त्यासाठी सहकार चळवळीला प्रोत्साहन दिले पाहिजे," असे वसंतराव यांना वाटत होते. सहकारामुळे शेतकऱ्यांना आपले पैसे उद्योगात गुंतवता येतात ग्रामीण भागात जे प्रश्न निर्माण होतात, ते सहकारामुळे सोडवता येतात . सहकारामुळे ग्रामीण व नागरी भागातील अंतर कमी होण्यास मदत होते त्यामुळे शहर व खेडे यातील लोक समान पातळीवर येतील वसंतराव नाईक यांच्या मते 'शेती विकास आणि शेतकऱ्यांचे कल्याण यासाठी सहकारी तत्त्वाची जोड अपरिहार्य आहे'.

वसंतराव नाईकांच्या काळात सहकारी चळवळीची पाळेमुळे ग्रामीण भागांमध्ये खोलवर पोहोचली आहेत. खेड्यातील पतपेढी गृहनिर्माण संस्था किंवा सहकार चळवळीशी इतर संघटना यांचा विकास झालेला आहे. काहीठिकाणी सहकारी तत्त्वावर अत्यंत माफक दरात लोकांना औषध उपचाराच्या सोयी पुरवण्यात येत आहेत असे दिसते.

## राजकीय नेतृत्व:

वसंतराव नाईकांकडे इतरांना आपलेसे करण्याची क्षमता म्हणजेच जबरदस्त संघटन कौशल्य होते .वसंतराव नाईक हे एक अष्टपैलू व्यक्तिमत्व होते. त्यांची तेजस्वी चारित्र्य, सभोवतालची आर्थिक व राजकीय परिस्थिती आणि अंगी असणाऱ्या गुणांच्या द्वारे केलेल्या कार्यामुळे त्यांच्या स्वरूपात एका सन्माननीय आणि समर्थ अशा नेतृत्वाची घडण झाली. वकील, उपमंत्री, मंत्री, मुख्यमंत्री अशी विविध अंगी भूमिका पार पाडतानाच बंजारा समाज आणि इतर समाजांसाठी केलेल्या कार्यामुळे त्यांची नेतृत्व अधिकच प्रबळ बनलेले दिसते. भारताचे माजी उपपंतप्रधान तसेच महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण नेहमी म्हणायचे,"वसंतराव नाईक यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र अतिशय सुरक्षित आहे, म्हणून त्यांच्या या नेतृत्वाची महाराष्ट्राला येथून पुढेही आवश्यकता आहे". आजच्या बदलत्या लोकशाही व्यवस्थेत आणि नवनिर्मित समाज रचनेत नेतृत्वाला अत्यंत महत्त्व प्राप्त झाले आहे.

## समारोप:-

वसंतराव नाईक यांचे सामाजिक आर्थिक व राजकीय योगदान स्पष्ट करताना या शोधनिबंधात कृषी, उद्योग, सहकार, रोजगार हमी योजना,कापूस एकाधिकार योजना व इतर योजनांचा आढावा घेतलेला आहे. तसेच वसंतराव नाईक यांचे नेतृत्व सर्वांगीण दृष्ट्या सक्षम व सर्वसमावेशक होते .त्यांच्या विविध योजना व निर्णयावरून वसंतराव नाईक हे एक दूरदृष्टीचे मुख्यमंत्री होते. तसेच वसंतराव नाईक यांचे योगदान महाराष्ट्राच्या आर्थिक, सामाजिक विकासाचा पाया आहे असे दिसून येते.

## निष्कर्ष

1. शेतकऱ्यांच्या शेतकऱ्यांना आर्थिक दृष्ट्या मजबूत करण्यासाठी वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्रात कृषी उत्पादन क्षेत्रात कृषी मालावर प्रक्रिया उद्योग व शेतीपूरक उद्योग उभारण्यास भांडवलदारांना व शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले.
2. मध्यस्थान मार्फत होणारे शेतकऱ्यांचे शोषण रोखण्यासाठी वसंतराव नाईक यांनी कापूस एखाधीकार योजना सुरु केली.
3. वसंतराव नाईक यांच्या नेतृत्वामुळेच महाराष्ट्रात हरित क्रांती घडून आली व त्यामुळे महाराष्ट्राचा आर्थिक विकास झाला.
4. वसंतराव नाईक यांनी सुरू केलेली रोजगार हमी योजना महाराष्ट्रातील जनतेकरिता वरदान ठरले.
5. वसंतराव नाईकांच्या कार्यामुळे व प्रेरणेद्वारे महाराष्ट्र अन्नधान्यात स्वयंपूर्ण बनला.
6. वसंतराव नाईकांच्या मुख्यमंत्री पदाच्या नेतृत्वामुळे महाराष्ट्रात दीर्घकाळ राजकीय स्थिरता टिकून होती.
7. वसंतराव नाईक यांचे नेतृत्व महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, कृषी विषयक क्षेत्रातील सर्वांगीण विकासाकरिता योगदान ठरले आहे.

## संदर्भ ग्रंथ


1. पवार, एकनाथराव. "आधुनिक कृषीप्रधान भारताचे कृषीसंत : वसंतराव नाईक". POKJ ISNN Journal - 2320-4494.
2. "कृषिदिनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर". नागपूर: महाराष्ट्र टाइम्स. २०१८.
3. डॉ. रतन राठोड .वसंतराव नाईक नेतृत्व आणि विकास-अथर्व प्रकाशन -2021
4. वसंत राव नाईक समृद्धीच्या वाट माहिती व जनसंपर्क महासंचनालाय मुंबई 1975, पृष्ठ 16-83
5. वसंत विचार वैभव -स्मरणिका 1990 पृष्ठ-34
6. "कृषीदुताच्या मोहीमेची शासनस्तरावर दखल". देशोन्नती. २०२०.